**तक्रार यूएलपी क्र १७९/२०१८.**
**नि.क्र.सी.१८ श्री शिवाजी तुकाराम हलकवडे**

शपथेवर कथन करतो की;

माझे नाव **श्री शिवाजी तुकाराम हलकवडे** वय.५१ वर्षे;रा.न्यू बुधवारपेठ;सम्राट चौक सोलापूर.

१. मला या न्यायालयाचे साक्षी समन्स मिळाले. त्यानुसार आजरोजी मी साक्षीसाठी हजर आहे.

**<u>सरतपासणी सामनेवालेतर्फे श्री एस एस कालेकर विधिज्ञ यांचेतर्फे</u>**

२. आजरोजी मी सोलापूर महानगरपालिका येथे शिपाई पदावर कार्यरत आहे. दि १०.०७.२०१३ रोजी माझी तुळजापूर चौत्रा नाक्यावर दुपारी ४ ते १२ रोजी अशी डयुटी होती. सदर दिवशी सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त मा गुडेवार आणि सहाययक आयुक्त श्री खंदारे यांनी अचानक भेट दिली. त्यावेळी मी रोडवरती एस्कॉर्टच्या गाडयांना सील लावत होतो. एस्कॉर्टच्या पावत्या करावयाचे काम श्री पंगूडवाले साहेब करीत होते आणि दुसरे श्री सुरवसे काम करीत होते. सदर दिवशी श्री सरवदे हजर नव्हते. मा आयुक्त व सहायक आयुक्त यांनी त्या दिवशी काय तपासणी केली हे मला माहित नाही. मा आयुक्तांनी उपस्थित असणा. यांना बोलावून घेतले व सहया घेतल्या मी त्याठिकाणी सही केली. त्या दिवशी उपस्थित असणा.या सर्वाच्या सहया घेतल्या किंवा कसे हे मला माहित नाही.

३. आता मला यादी नि क्र सी.१० पान नं १६ (सी १७) दाखविण्यात आला तो दि.१०.०७.२०१३ रोजीचा पंचनामा आहे त्यावर माझी सही आहे. सदर दिवशी पंचनाम्यामध्ये काय लिहिले होते मला सांगितले नाही केवळ सही करण्यास सांगितले म्हणून मी सही केली. हे खरे नाही की श्री सरवदे यांनी तक्रारदार श्री बनसोडे ₹ १६०००/– घेवून गेल्याचे माझेसमोर सांगितले. मला हे माहित नाही की दूरध्वनीव्दारे श्री बनसोडे यांनी सदरची रक्कम घेतलेबाबत कबूल केले होते. माझी पंचनाम्यावरती सही घेतली त्याबददल मी कुठेही तक्रार केली नाही.

**<u>सरतपासणी पूर्ण.</u>**

**उलटतपासणी तक्रारदारातर्फे श्री बी टी जाधव विधिज्ञ यांचेतर्फे,**

४. उलटतपासणी घेण्याचे सोडून दिले असे सांगितले.

**उलटतपासणी पूर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**

**फेरतपास काही नाही.**

सही/-

(मु. रा. कुंभार)
सदस्य
औद्योगिक न्यायालय सोलापूर

सोलापूर.
दि.१६.१०.२०२५
*माकम*